**महाराष्ट्र शासन**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.**
**क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**
ईमेलः maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट : www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/नीटयुजी-२०१७/नोटीस क्र.२५/११७८/२०१७ दिनांकः- १५.११.२०१७.

# NEET UG - 2017
# NOTICE
## ( Only for Candidates Registered on DMER website )

**खाजगी विनाअनुदानित होमिओपॅथी महाविद्यालयात नव्याने उपलब्ध झालेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव जागांवरील प्रवेशाकरिता "महाविद्यालय स्तरावरील** (Institutional level) **प्रवेश प्रक्रीया "** (Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions Rule, २०१६ मधील Rule No.१६ )

केंद्रसरकार, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी नाकारल्याने महाविद्यालयांनी दाखल केलेल्या न्यायालयीन याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार खालील नमूद महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या जागा नव्याने उपलब्ध झालेल्या आहेत -

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | धन्वंतरी होमिओपॅथीक महाविद्यालय, नाशिक ( न्या.या.क्र. 11792 /2017 ) | ७५ |
| २ | वेणूताई चव्हाण होमिओपॅथीक महाविद्यालय, कोल्हापूर (न्या.या.क्र.11785/ 2017) | ५० |
| ३ | जी.एन.आर होमिओपॅथीक महाविद्यालय, सोलापूर ( न्या.या.क्र. 11608 of 2017 ) | ५० |
| ४ | श्री चामुंडामाता होमिओपॅथीक महाविद्यालय, जळगाव (न्या.या.क्र. 31071/2017 ) | ५० |

वरीलप्रमाणे उपलब्ध जागांपैकी शासकीय कोटयातील (८५%) जागांवर विद्यार्थी प्रवेश करण्याकरिता "महाविद्यालय स्तरावरील (Institutional level) प्रवेश प्रक्रीया" खाली दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात येत आहे -

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १) | *रिक्त जागांचा तपशील वेबसाईटवर (www.dmer.org तसेच www.mahacet.org ) वर टाकण्यात येईल. | दि.१५.११.२०१७ |
| २) | उमेदवारांनी रिक्त जागांचा तपशील क्रमांक ०१ प्रमाणे पाहून त्यांच्या निवडीप्रमाणे व्यक्तीशः किंवा त्यांचे पालकांनी को-या कागदावर अथवा संबंधित महाविद्यालयाच्या ई मेल वर अर्ज सर्व आवश्यक प्रमाणपत्रासह संबंधित महाविद्यालयाकडे सादर करावा. | दि.१६.११.२०१७ ते दि.१९.११.२०१७ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३) | महाविद्यालयाने प्राप्त अर्जातून ( ऑनलाईन व ऑफलाईन अर्जातून ) गुणवत्ता यादी नोटीस बोर्डावर व महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची वेळ | दि.२०.११.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत |
| ४) | महाविद्यालयाने गुणवत्तेनुसार उमेदवारास प्रवेश देण्याची प्रक्रिया (जे उमेदवार NEET UG- 2017 या ब्रोशर मध्ये नमूद सर्व मुळ प्रमाणपत्र जमा करतील फक्त त्यांनाच महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश घेता येईल) | दि.२२.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. ते दुपारी ०२.०० |

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ५) | घटनात्मक आरक्षणाच्या जातीच्या प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्यास सदर जागांकरिता **NEET UG - 2017** माहितीपुस्तिका (**Brochure**) मधील **Annexure - B (7)** नुसार इंटरसे प्रवेश प्रक्रीया राबविणे. सदर प्रवेश प्रक्रीयेत सर्व घटनात्मक आरक्षणाच्या जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश असेल. | दि.२२.११.२०१७ रोजी दुपारी ०३.०० |
| ६) | महाविद्यालयाने प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील, आयुष संचालनालयात ई-मेलद्वारे directorayurvedmaha@gmail.com सादर करणे. | दि.२२.११.२०१७ रोजी संध्याकाळी ०७.३० वाजेपर्यंत |

उमेदवारांनी महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता आवश्यक मुळ प्रमाणपत्रे **NEET UG - 2017** माहितीपुस्तिका (**Brochure**) मध्ये नमूद केल्यानुसार सादर करणे अनिवार्य आहे.

**उमेदवारांसाठी अतिमहत्वाच्या सूचना**

१) उपरोक्त महाविद्यालयातील प्रवेश हे मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहातील, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. तद्अनुषंगाने, "हमीपत्र" महाविद्यालयास प्रवेश घेताना सादर करावयाचे आहे.

२) ज्या उमेदवारांनी **NEET UG - 2017** ही परीक्षा दिलेली आहे, तसेच ज्यानी www.dmer.org या संकेत स्थळावर नोंदणी केलेली आहे व **NEET UG - 2017** ब्रोशर मध्ये नमूद केलेल्या पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत असतील असे उमेदवार या महाविद्यालय स्तरावरील प्रवेशफेरीच्या प्रक्रीयेसाठी अर्ज सादर करु शकतील.

*३) दिनांक १५.११.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या महाविद्यालय निहाय उपलब्ध असणाऱ्या रिक्त जागा तसेच त्यानंतरही नव्याने रिक्त झालेल्या जागा याच फेरीमध्ये महाविद्यालयांना प्राप्त झालेल्या अर्जामधुनच भरण्यांत येतील.

४) ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रवेशफेरी मध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळाला असेल व उमेदवार संबंधित महाविद्यालयात दि.१५.११.२०१७ रोजी रुजू असतील असे उमेदवार या प्रवेशफेरीस अपात्र असतील म्हणजेच अशा उमेदवारांना सदर महाविद्यालयस्तरावरील प्रवेशफेरीसाठी अर्ज करता येणार नाही.

५) ज्या उमेदवारांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे तेथे दि.२२.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला यासह संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहाणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

६) या प्रवेशफेरीत निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क धनाकर्ष / धनादेश किंवा रोखीने त्वरित अदा करुन आपला प्रवेश कायम करावा.

७) उमेदवारांनी आपल्या संबंधित महाविद्यालयातील गुणवत्ता यादीतील क्रमांक व महाविद्यालयामध्ये उपलब्ध जागा यांचा तपशील बघूनच संबंधित महाविद्यालयात प्रवेशाकरीता उपस्थित रहावे.

८) उमेदवारांना कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी maharashtra.cetcell@gmail.com या ई-मेलवर किंवा ०२२-२२६५२२५९ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

९) महाविद्यालयाने/संस्थेने उमेदवाराकडे देणगी अथवा अतिरिक्त फीची मागणी केल्यास, उमेदवाराने नजिकच्या पोलीस स्टेशनमध्य FIR नोंदवून त्याची प्रत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास सादर करण्यात यावी.

१०) मा.आयुक्त व सक्षम प्राधिकारी राज्य सीईटी सेल, यांनी निरिक्षकांची नेमणूक केली आहे. उमेदवाराची प्रवेशाबाबत काही तक्रार असल्यास ती निरीक्षकांना द्यावी. त्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

**सही/-**
**(राजीव निवतकर)** भा.प्र.से.
**सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य सीईटी कक्ष, महाराष्ट्र राज्य**

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ - खाजगी विनाअनुदानीत होमिओपॅथी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया दि.१५-११-२०१७ ते दिनांक २२-११-२०१७**

## Institutional Round

---

दिनांक :

## <u>हमी पत्र नमुना</u>

मी, कु./कुमारी.............................................................................................

AIR No............................. आज दि............................... रोजीच्या महाविद्यालयीन स्तरावरील प्रवेशप्रक्रीयेत, माझ्या पसंतीनुसार ________________________________________ या महाविद्यालयात प्रवेश घेत आहे. सदर महाविद्यालयास केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेली नाही. याप्रकरणी संबंधित महाविद्यालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या न्यायालयीन याचिका क्र. ________________________मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार या महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश करण्यात येत आहेत. सदर याचिकेसंदर्भात मा.न्यायालयाचा जो काही अंतिम निर्णय होईल, तो मला मान्य आहे. या वस्तुस्थितीची पूर्ण जाणीव संबंधित प्रवेश प्राधिकारी तथा महाविद्यालयाने मला करुन दिलेली आहे. सदर प्रवेश मी माझ्या जबाबदारीवर घेत आहे, याची मला पूर्ण कल्पना आहे.

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे नाव | पालकांचे नाव |
| आणि सही | आणि सही |
| मोबाईल नं - | मोबाईल नं - |